*जेंव्हा जेंव्हा मला देशी, परदेशी डॉक्टर भेटतात,*
*जेंव्हा जेंव्हा मला ॲलोपॅथ आणि दिशाहीन होमिओपॅथ भेटतात,*
*तेंव्हा तेंव्हा ते मला विचारतात -*
*"काय आहे त्या होमिओपॅथीत दम ? होमिओपॅथीने तुला काय दिलं ? "*

*आता कसं सांगू त्यांना,*
*"होमिओपॅथीने मला नेमकं काय दिलं ?"*

*आकाशाची व्यापकता दिलीच दिली*
*पण धरतीचं काळीज सुद्धा दिलं.*
*माणूस तर वाचायला शिकवलाच शिकवला*
*पण खरा पेशंटही वाचायला शिकवला.*

*जसं हॅनेमनचं मन दिलं,*
*तसं समः सम्यम् शमयंती मंत्राचं तंत्र कळालं.*
*विकारावर, वेदनांवर झटकन मात करणारं*
*संजीवनीचं भांडार दिलं.*

*आता कसं सांगू त्यांना,*
*"होमिओपॅथीने मला नेमकं काय दिलं ?"*

*आत्मबल तर दिलच दिलं,*
*"डेअर टु बी वाईस" हे वाक्य दिलं.*
*पर्वतासारख्या आजाराला भुईसपाट केल,*
*एड्स सारख्या वादळाला जागेवर थांबवून ठेवलं.*

*आता कसं सांगू त्यांना,*
*"होमिओपॅथीने मला नेमकं काय दिलं ?"*

*जगण्यातला आनंद तर दिलाच दिला ,*
*परंतू कित्येक गंभीर पेशंट्सला जीवदान दिलं.*

*मी खरच सांगतो तुम्हाला,*
*अशाश्वत अस काहीच नाही दिलं.*
*जे दिल ते सारं शाश्वतचं दिलं -*
*ज्याने अमरला खरोखरचं अमर केल.........*

*- डॉ. अमरसिंह निकम.*